नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करिता सुधारित सुकाणू समितीस मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम १९०४६/४४/२०२५/MAG-८A (E-१२६२२८५)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - १३ डिसेंबर, २०२५

**वाचा:-**

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८अे, दि.३० जून, २०२३
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८अे, दि.१४ ऑक्टोबर, २०२४
३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. कृवपदुम-१९०४६/४/२०२५ MAG-८A (E-९४५२०३), दि. १२ सप्टेंबर, २०२५

**प्रस्तावना :-**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या यशस्वीतेमुळे राज्याच्या इतर जिल्ह्यांमधील गावांचा या प्रकल्पामध्ये समावेश करण्याची मागणी विचारात घेऊन दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार उपरोक्त वाचा मधील क्र. १ येथील दिनांक ३० जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशीव, लातूर, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, जळगाव व नाशिक या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु.६००० कोटी (अक्षरी रुपये सहा हजार कोटी मात्र) किंमतीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. वाचा मधील क्र. २ येथील दिनांक १४.१०.२०२५ च्या शासन निर्णयान्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ करिता २१ जिल्ह्यातील ७२०१ गावांचा समावेश करण्यास तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विविध बाबींना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ साठी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली सुकाणू समितीचे गठन करण्यात आले आहे.

२. श्री. रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी काम करण्याकरिता इच्छुकता दर्शविली होती. श्री. सावरकर यांचा कृषि क्षेत्रातील अभ्यास लक्षात घेता त्यांचे मार्गदर्शन व सहभाग अधिक प्रभावी व्हावा, यासाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करिता गठीत केलेल्या सुकाणू समितीमध्ये श्री. रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य यांचा सह अध्यक्ष म्हणून समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :**

१. मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी दिनांक १४.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीमध्ये सुधारणा करुन, खालीलप्रमाणे सुधारित सुकाणू समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २. | श्री. रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य | सह अध्यक्ष |
| ३. | सचिव/ प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ४. | सचिव/ प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ५. | सचिव/ प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, सहकार व पणन विभाग | सदस्य |
| ६. | सचिव/ प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, कृषि विभाग | सदस्य |
| ७. | सचिव/ प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, पदुम विभाग | सदस्य |
| ८. | सचिव/ प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, जलसंधारण विभाग | सदस्य |
| ९. | आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे | सदस्य |
| १०. | कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| ११. | कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| १२. | कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | सदस्य |
| १३. | प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प | सदस्य सचिव |
| १४. | निमंत्रित सदस्य | आवश्यकतेनुसार व अध्यक्षांच्या अनुमतीने |

२. सदर सुकाणू समितीची कार्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत :-

i. प्रकल्प अहवाल, प्रकल्प अंमलबजावणी आराखडा व विविध कार्यप्रणाली पुस्तिका (Manuals) इ. तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे, त्यास मान्यता देणे व मंत्रिमंडळाची मान्यता घेणे.

ii. प्रकल्प अंमलबजावणीसाठी धोरणात्मक बाबीसंबंधी मार्गदर्शन करणे.

iii. वार्षिक कृति आराखड्यास मान्यता देणे व आढावा घेणे.

iv. प्रकल्पासंबंधित वेगवेगळ्या विभागामध्ये समन्वय साधण्यासंबंधी निर्देश देणे.

v. प्रकल्पाच्या मंजूर आराखड्यामध्ये परिस्थितीनुरुप आवश्यक बदलास मान्यता देणे. तसेच, जागतिक बँकेच्या सुचनांप्रमाणे विविध पुस्तिकांतील बदलास मान्यता देणे.

vi. प्रकल्पाच्या मंजूर आराखड्यातील घटकांच्या / बाबींच्या अंमलबजावणीबाबत तांत्रिक सल्ला देणे.

३. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार सह अध्यक्षांना बैठका घेण्याची मुभा राहील.

४. श्री. रणधीर सावरकर, सह अध्यक्ष, सुकाणू समिती, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प यांना त्यांचे कामकाज पार पाडण्याकरिता सुयोग्य अशी जागा, कर्मचारी वृंद तसेच वाहन

अथवा वाहन भत्ता उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय व वित्तीय प्राधिकारानुसार प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प यांनी कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१२१३१६४९३४३००१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2025.12.13 17:26:37 +05'30'

**( भुपेश अ. कोळी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.राज्यसभा/लोकसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
४. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,
५. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा.मंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
११. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव, सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. अपर मुख्य सचिव (कृषि ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प टप्पा-२, मुंबई
१९. संचालक (नियोजन व प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२०. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२१. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२२. संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२३. संचालक (अभियांत्रिकी संचालनालय), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२४. कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला,
२५. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी,
२६. कुलगुरु,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
२७. कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२८. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व),
२९. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
३०. कृषि आयुक्त, (अेजी १० सेल) महाराष्ट्र राज्य, पुणे (खर्च ताळमेळ शाखा),

३१. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर,
३२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर,
३३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
३६. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
३७. उप सचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
३८. उप सचिव, नियोजन विभाग (कार्यासन-१४३१) मंत्रालय, मुंबई,
३९. उप सचिव, सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. उप सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
४१. उप सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४२. कक्ष अधिकारी, सर्व कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४३. निवडनस्ती (कार्यासन-८-अे)